आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ जुलै २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मालदीवची राजधानी मालेमध्ये दाखल

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पाचव्या दिवशीही दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ सुरूच, राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात सरकारी उच्च प्राथमिक शाळेची इमारत कोसळून पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू, २०हून अधिक जण जखमी

- थायलंड आणि कंबोडिया यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर थायलंडच्या भारतीय दूतावासाकडून पर्यटकांसाठी सूचना जारी

**आणि**

- फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख या दोन्ही भारतीय खेळाडूंमध्ये उद्या अंतिम लढत होणार

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मालदीवची राजधानी माले इथं पोहोचले. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांनी व्हॅलेना आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रधानमंत्री मोदी यांचं स्वागत केलं. प्रधानमंत्री मोदी दोन दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर असून हा त्यांचा तिसरा मालदीव दौरा आहे.

प्रधानमंत्री मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मुइझ्झू आज विविध मुद्द्यांवर चर्चा करतील. गेल्या वर्षी मालदीवचे अध्यक्ष मुइझ्झू भारत दौऱ्यावर आले असताना झालेल्या भारत-मालदीव संयुक्त व्यापक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारीच्या अंमलबजावणीतील प्रगतीचा आढावाही ते घेतील. मुइझ्झू यांच्या दौऱ्यादरम्यान मालदीवमध्ये रूपे कार्डाची सुरुवात झाली होती. तसंच भारत आणि मालदीवला यूपीआयद्वारे जोडायलाही दोन्ही देशांनी संमती दिली होती. यासंदर्भात भारताचे उच्चायुक्त जी. बालसुब्रमण्यम यांनी आकाशवाणीला माहिती दिली.

**- होल्ड... बाईट- जी. बालसुब्रमण्यम -**

उद्या मालदीवच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात प्रधानमंत्री मोदी सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मोदी यांचा हा दौरा भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरणाचं आणि 'व्हिजन ओशन'चं महत्त्व अधोरेखित करतो.

मूळचे पुण्याचे असलेले डॉ. चंद्रशेखर रावळ सध्या मालदीवमध्ये कार्यरत आहेत. प्रधानमंत्री मोदी यांची भेट घेण्याचा अनुभव अतिशय चांगला होता अशी प्रतिक्रिया त्यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

**- होल्ड.. बाईट - चंद्रशेखर रावळ-**

दरम्यान, उद्या मायदेशी परतल्यानंतर प्रधानमंत्री मोदी दोन दिवसांच्या तामिळनाडू दौऱ्यावर जातील. शनिवारी ते तुतिकोरिन इथं ४ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण करतील. तसंच तुतीकोरिन विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटनही करतील.

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या पाचव्या दिवशीही दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ सुरूच राहिला. लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीमुळं सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर २६व्या करगिल विजय दिवसानिमित्त सर्व सभासदांनी या युद्धात वीरश्री गाजवलेल्या जवानांना अभिवादन केलं आणि यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ मौन पाळलं. यानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. इतक्यात विरोधी पक्षांचे सदस्य बिहारच्या मतदार यादी पुनरीक्षणासह इतर मुद्द्यांवर चर्चेची मागणी करत हौद्यात उतरले. बिर्ला यांनी त्यांना सभागृहाचं कामकाज चालू देण्याची विनंती केली, तसंच ही वर्तणूक सभागृहाच्या शिस्तीला धरून नसल्याचं सांगितलं. मात्र, विरोधकांचा गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत कामकाजाच्या सुरुवातीला कमल हासन यांच्यासह तमिळनाडूच्या इतर नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी झाला. यानंतर, बिहारच्या मतदार यादी पुनरीक्षणासह इतर विविध मुद्द्यांवर विविध राजकीय पक्षांकडून २८ स्थगन प्रस्ताव मिळाल्याची, आणि ते फेटाळल्याची माहिती सभागृहाचे उपसभापती हरिवंश यांनी दिली. त्यांनी विरोधकांना

कामकाज सुरळीत चालू देण्याचं आवाहन केलं. शून्य प्रहर पुकारल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजीला सुरुवात केल्यामुळे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, मात्र विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><>

आंध्र प्रदेश आणि तेलंगणमधल्या विधानसभा मतदारसंघांची संख्या वाढवण्यासाठी परिसीमन प्रक्रिया सुरू करायचे निर्देश केंद्र सरकारला देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या पीठानं हा निर्णय दिला.

<><><><>

माहिती तंत्रज्ञान कायद्याचं उल्लंघन केल्यामुळे केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने २५ संकेतस्थळांवर बंदी घातली आहे. या संकेतस्थळांवर आक्षेपार्ह आणि अश्लील आशय असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर ही बंदी घालण्यात आल्याचं यासंदर्भातल्या अधिसूचनेत मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

लडाखमध्ये आजपासून २६ वा कारगिल विजय दिवस साजरा केला जात आहे. या दरम्यान, १९९९ च्या कारगिल युद्धातील शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी द्रास आणि कारगिलमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे.

राष्ट्रीय अभिमानाचे आणि भारतीय सैनिकांच्या धैर्याचे प्रतीक असलेल्या झोजिला युद्ध स्मारकावर आज राष्ट्रध्वज फडकवला जाईल.

<><><><>

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात सरकारी उच्च प्राथमिक शाळेची इमारत कोसळून पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर २०पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले. गावकऱ्यांनी तातडीनं जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल केलं. गंभीर जखमी असलेल्या १० विद्यार्थ्यांना झालावार वैद्यकीय रुग्णालयात हलवल्याची माहिती झालावारच्या पोलीस अधीक्षकांनी दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच राजस्थानचे

मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केलं. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करायची घोषणा शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी केली.

<><><><>

थायलंड आणि कंबोडिया यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर थायलंडच्या भारतीय दूतावासाने तिथल्या भारतीय पर्यटकांसाठी सूचना जारी केल्या आणि सतर्क राहण्याचं आवाहन केलं. थायलंडच्या पर्यटन प्राधिकरणानं देशातल्या सात प्रांतांमधल्या अनेक पर्यटक ठिकाणांना भेटी न देण्याचा सल्ला दिला. बुधवारी झालेल्या भूसुरुंग स्फोटात थायलंडचे पाच जवान जखमी झाले. यानंतर दोन्ही देशांनी परस्परांच्या राजदूतांना पदच्युत केलं. थायलंड आणि कंबोडिया यांच्यातल्या सीमेजवळ दोन देशांच्या लष्करांमध्ये बुधवारी झालेल्या संघर्षात थायलंडच्या १४ नागरिकांचा मृत्यू झाला, तर इतर ४६ जण जखमी झाले. कालही सीमेलगतच्या किमान सहा ठिकाणी चकमकी उडाल्या.

<><><><>

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताच्याच कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख या दोघींमध्ये उद्या अंतिम लढत होणार आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत दिव्या देशमुख हिनं चीनची ग्रँडमास्टर तान झाँगयी हिच्यावर मात केली, तर कोनेरू हंपीनं चीनची ग्रँडमास्टर लेई टिंगजिए हिचा पराभव केला. आता या स्पर्धेचं जेतेपद आणि उपविजेतेपद भारताकडे येणार आहे. भारतासाठी हा बुद्धिबळाच्या पटावरचा मोठा मैलाचा दगड ठरणार आहे.

<><><><>

इजिप्तमध्ये कैरो इथं झालेल्या २०२५ च्या जागतिक स्क्वॉश ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय स्क्वॉशपटू अनाहत सिंग हिने उपांत्य फेरीत विजय मिळवला आहे. अनाहतने इजिप्तच्या मलिका एलकाराक्सीचा पराभव केला. २०१०नंतर या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला आहे.

<><><><>

हवामान विभागानं आज ओदिशा, पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या काही भागांना अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगढ, ओदिशा, झारखंड आणि पश्चिम बंगालच्या गंगा नदीनजीकच्या भागात २८

जुलैपर्यंत जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, उत्तर प्रदेश, कोकण आणि गोव्यात महिनाअखेरपर्यंत अशीच स्थिती राहील. देशाच्या दक्षिण भागात, केरळ, माहे, तसंच कर्नाटकाच्या काही भागांत येत्या पाच दिवसांत जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडेल. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात वादळी वारे आणि विजांसह हलक्या पावसाची शक्यता आहे.

**//<><><><>//**